

आगोंद किनाऱ्यावरील १८ अस्थापनाचे टाळे हटवले
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



दिल्ली कॅपिटल्सने साधली विजयाची हॅट्ट्रिक
पान ४ वर

वेर्णा, रविवार, ६ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 213 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 6 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### नियंत्रण रेषेवर घुसखोर ठार

**जम्मू, दि. ५ :** जम्मूमधील आंतरराष्ट्रीय सीमेवर सतर्क असलेल्या सीमा सुरक्षा दलाने शुक्रवारी रात्री उशिरा पाकिस्तानकडून झालेला घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला. आरएस पुरा सेक्टरमधील अब्दुलियन भागात बीएसएफ जवानांनी एका पाकिस्तानी घुसखोराला ठार केले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली.बीएसएफने दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षा सैन्याच्या तुकडीला ४ आणि ५ एप्रिलच्या मध्यरात्री आंतरराष्ट्रीय सीमारेषेजवळ संशयास्पद हालचाली दिसून आल्या. एका व्यक्तीने भारतीय हद्दीत घुसण्याचा प्रयत्न केला. त्याला बीएसएफ जवानांनी अनेक वेळा इशारा देऊनही आणि गोळीबार करूनही घुसखोर माघारी परतला नाही. यामुळे सुरक्षा दलाने गोळीबार करून त्याला ठार केले. या घुसखोराची ओळख पटवली जात आहे.

### शक्तिशाली पासपोर्टच्या यादीत भारत १४८ स्थानी

**नवी दिल्ली, दि. ५ :** जगातील सर्वात शक्तिशाली पासपोर्टच्या यादीत प्रथमच आयर्लंडने अव्वल क्रमांक पटकावला आहे, तर भारतालाला १४७ व्या स्थानावरून १४८व्या स्थानावर समाधान मानावे लागले. टॅक्स आणि इमिग्रेशन कन्सल्टन्सी नोमॅड कॅपिटलिस्टने २०२५ च्या क्रमवारीत आयर्लंडला पहिला क्रमांक दिला. गेल्या वर्षीच्या तुलनेत भारताचा पासपोर्ट आणखी खाली घसरला आहे. या क्रमवारीसाठी नोमॅड कॅपिटलिस्टने जगभरातील १९९ देशांचा अभ्यास केला. शक्तिशाली पासपोर्टची क्रमवारी ठरवताना पाच मुख्य घटक विचारात घेण्यात आले. व्हिसामुक्त प्रवास, कर प्रणाली, देशाची प्रतिमा, दुहेरी नागरिकत्व सुविधा आणि व्यक्ती स्वातंत्र्य या घटकांच्या आधारे आयर्लंडचा पासपोर्ट जगात सगळ्यात पॉवरफुल ठरला. साधारणपणे पासपोर्टची ताकद किती देशांमध्ये व्हिसामुक्त प्रवास मिळतो यावरून मोजली जाते.

### नेपाळमध्ये भूकंपाचा धक्का

**काठमांडू, दि. ५ :** नेपाळमध्ये आज संध्याकाळी ७:५२ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. भूकंपाची तीव्रता ५.० रिश्टर स्केल इतकी होती. सध्या या भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, उत्तर भारतातही या भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. नॅशनल सिस्मॉलॉजिकल सेंटरनुसार, भूकंप २० किमी खोलीवर झाला आहे. उत्तराखंडमधील पिथौरागढ हे भूकंपाचे केंद्र होते. नेपाळ हा जगातील सर्वात सक्रिय भूकंपप्रवण प्रदेशांपैकी एक आहे, जेथे भूकंपाचा धोका कायम आहे. शुक्रवारी (२८ मार्च ) म्यानमार आणि थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये शक्तिशाली भूकंपामुळे मोठा विध्वंस झाला. त्या दिवशी सकाळी नेपाळमध्ये ६.१ रिश्टर स्केलचा भूकंप झाला, ज्याचे धक्के बिहार, सिलीगुडी आणि भारताच्या इतर शेजारच्या भागात जाणवले. भूकंपामुळे थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये निर्माणाधीन एक बहुमजली इमारत कोसळली.

### हवामान

कमाल : ३४ किमान : २६
आर्द्रता : ६९

### बाजार भाव

सोने : ₹ ९१,२२५ (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९४,००० (१ किलो)

### शेअर मार्केट


सेन्सेक्स : ७५,३६४ .७७ ↑ (९३०.६७ )
निफ्टी : २२,९०५.९० ↑ (८३.९५)

# ड्रग्ज धंद्यातील स्लिपर सेल्स कार्यरत

## इस्रायली ड्रग्ज डीलर अटालाला अटक ८. ७० लाखांच्या ड्रग्जसहित ४० हजारही रुपये जप्त

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ५ : १५ वर्षांपूर्वी अंमली पदार्थ प्रकरणात अटक झालेला इस्रायली नागरिक निव्ह बेनाहिम (५० रा. शिवोली) ऊर्फ अटाला याला पुन्हा अटक करण्यात आली आहे. गोवा पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी विभागाने शिवोली येथे त्याच्या भाड्याच्या निवासस्थानी छापा टाकून ८.७० लाख रुपये किमतीचे ड्रग्ज आणि ४० हजार रुपये रोख जप्त केले.**



एएनसीच्या पथकाने अटालाच्या घरातून ५० ग्रॅम कोकेन आणि ११० ग्रॅम चरस जप्त केले. यापूर्वीही हणजूण पोलिस ठाण्यात २०१० आणि २०१९ मध्ये दाखल हल्ल्याच्या गुन्ह्यांमध्ये त्याला अटक झाली होती, मात्र त्याच्या ताब्यातून ड्रग्ज जप्त करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

गुप्त माहितीच्या आधारे एएनसीच्या गुप्तहेरांनी बनावट ग्राहकाद्वारे अटालाशी संपर्क साधला. सौद्याच्या वेळी पोलिसांनी छापा टाकत त्याला रंगेहाथ पकडले. त्यानंतर शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

मार्च २०१० मध्ये अटालाच्या पोलिस आणि ड्रग्ज माफियांशी असलेल्या संबंधांमुळे मोठा गदारोळ उडाला होता. त्याची प्रेयसी लकी फार्महाऊस हिने व्हिडिओ कबुलीजबाब देत पोलिसांच्या सहभागाचा खुलासा केला होता. या प्रकरणात एका पीआयसह पाच पोलिसांना निलंबित करण्यात आले होते. पुढे हा खटला सीबीआयकडे वर्ग करण्यात आला.

२०१२ मध्ये अटाला पेरूमधून प्रत्यार्पण झाला. मात्र, न्यायालयाने त्याला आणि निलंबित पोलिस अधिकाऱ्यांना निर्दोष मुक्त केले. २०१९ मध्ये त्याच्यावर पुन्हा हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल झाला होता. २०२० मध्ये गोवा येथील मुंबई उच्च न्यायालयाने तपासातील विसंगती पाहून त्याला सशर्त जामीन मंजूर केला.

या कारवाईमध्ये हेड कॉन्स्टेबल उमेश देसाई, युस्टाक्युआओ फर्नांडिस, आणि कॉन्स्टेबल गोडिश गोलतेकर, सुमित मुटकेकर, साईराज नाईक, राहुल गावस, विशाल शितोळे, तसेच महिला कॉन्स्टेबल स्नेहा साळवी आणि सीमा आरपारकर यांचा समावेश होता. पोलिस आता त्याच्या व्हिसा स्थितीचा तपास करत असून, तो भारतात कायदेशीररीत्या राहत होता का, याची चौकशी केली जात आहे.

## दहावीचा निकाल सोमवारी जाहीर होणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ५ :** गोवा शालान्त मंडळाने घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवार, दि. ७ एप्रिल २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता जाहीर होईल. निकाल मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. विद्यार्थ्यांना मंडळाच्या www.gbshse.in आणि http://results.gbshsegoa.net/# / या वेबसाईट्सवर निकाल पहायला मिळणार आहे. यंदा १८८३८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९२८० या मुली तर ९५५८ हे मुलगे परीक्षेला बसले आहेत.


गोवा शालान्त मंडळाने १ मार्च २०२५ ते २१ मार्च २०२५ दरम्यान राज्यात दहावीची परीक्षा घेतली होती. ही परीक्षा राज्यभरातील तब्बल ३२ अधिक ४ (उर्दू माध्यम) परीक्षा केंद्रांत घेण्यात आली आहे. गेल्या वर्षीचा विचार करता १० वीच्या परीक्षेत तब्बल १८९१४ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी सुमारे, १७४७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एकूणच निकाल हा ९२.३८ टक्के लागला होता.

## मद्यधुंद पर्यटकाने उडवल्या चार कार आणि स्कूटर

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. ५ :** शुक्रवारी रात्री कळंगुटमधील सेंट अँथनी चॅपल जंक्शनजवळ मद्यधुंद अवस्थेत असलेल्या हैदराबादच्या एका पर्यटकाने चार पार्क केलेल्या टॅक्सी, कार आणि एका स्कूटरला धडक दिली. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

प्राथमिक माहितीनुसार, संबंधित पर्यटक आपल्या भाड्याच्या कारमधून प्रवास करत होता. स्वतः चे स्थान तपासात असताना त्याने कार रस्त्याच्या कडेला थांबवली. मात्र, हँडब्रेक लावण्याऐवजी त्याने चुकून कार रिव्हर्स गियरमध्ये ठेवली आणि ॲक्सिलरेटर दाबला. त्यामुळे कार वेगाने मागे गेली आणि समोरील पार्क केलेल्या कारला धडकली. या धडकेमुळे दुसरी कार तिसऱ्या कारवर आदळली, तिसरी कार चौथ्या कारला धडकली आणि अखेरीस एका स्कूटरवरही परिणाम झाला. अखेर पर्यटकाने गाडीवर नियंत्रण मिळवत ही साखळी थांबवली.



या घटनेनंतर पर्यटक टॅक्सी चालकांनी संबंधित पर्यटकाला घेरले. घाबरलेल्या पर्यटकाने माफी मागत नुकसानभरपाई देण्याची तयारी दर्शवली. दरम्यान, कळंगुट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपी पर्यटकाला पोलिस ठाण्यात नेले. तपासादरम्यान, त्याने मोपा विमानतळावरून ही कार भाड्याने घेतल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी कारमध्ये मद्याच्या बाटल्याही आढळल्याचे सांगितले.

शुक्रवारीच झालेल्या दुसऱ्या घटनेत, नेरुळ येथे झालेल्या अपघातानंतर तीन पर्यटकांनी तुये येथील जोकिम फर्नांडिस या टॅक्सीचालकावर हल्ला केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी, पर्वरी येथील रहिवासी आशिष कुमार पंडित (३०) आणि उत्तर प्रदेशातील आकाश राणा (३०) व अभिषेक सिंग (२५) यांना पर्वरी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम १७० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या दोन्ही घटनांमुळे गोव्यातील पर्यटकांच्या वर्तणुकीबाबत चिंता व्यक्त केली जात असून, स्थानिक प्रशासनाने यावर कठोर पावले उचलण्याची मागणी केली जात आहे.

# ट्रम्प टॅरिफमुळे जागतिक शेअर बाजारात मोठी घसरण

## जागतिक मंदी येण्याची अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली भीती

टीम दैनिक हेराल्ड

**वॉशिंग्टन, दि. ५ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणातील अनिश्चिततेमुळे अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्ध तीव्र होत असून, त्याचा परिणाम जागतिक शेअर बाजारावर दिसून येत आहे. मोठ्या कंपन्यांच्या समभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर घसरण झाली आहे. वॉल स्ट्रीटवर मोठ्या प्रमाणात विक्री झाली असून, प्रमुख निर्देशांकांनी मोठी घसरण नोंदवली आहे. डाऊ जोन्स इंडस्ट्रियल एव्हरेज हा २००० हून अधिक अंकांनी कोसळला, तर एस अँड पी ५०० हा मार्च २०20 नंतरच्या सर्वात मोठ्या दोन दिवसांच्या घसरणीत गेला आहे. तसेच नॅस्डॅक कंपोझिट मंदीच्या बाजारात पोहोचला आहे. कोविड–१९ महामारीनंतर अमेरिकन शेअर बाजारातील ही सर्वात मोठी घसरण असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे.



या सततच्या घसरणीमुळे शेअर बाजाराच्या एकूण बाजार मूल्यात तब्बल ५ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा अधिक नुकसान झाले आहे. एस अँड पी ५०० निर्देशांक अवघ्या दोन दिवसांत १० टक्के खाली आला आहे. शुक्रवारी रात्रीच्या मोठ्या विक्रीनंतर, डाऊ जोन्स आता त्याच्या ५२ आठवड्यांच्या नीचांकी पातळीपासून केवळ ७०० अंकांनी दूर आहे. ट्रेझरीच्या १० वर्षांच्या उत्पन्नातही घट झाली असून ते ३.९९ टक्केपर्यंत खालीआले आहे. डॉलरच्या मूल्यात मात्र १ टक्के वाढ झाली आहे. प्रमुख. तंत्रज्ञान कंपन्यांमध्येही मोठी घसरण दिसून आली, एनव्हीडिया आणि टेस्ला यांच्या समभागांमध्ये ७ टक्के पेक्षा जास्त घसरण झाली. अमेरिकन बाजारात सूचीबद्ध चीनी कंपन्या, जसे अलिबाबा ग्रुप आणि बायडू, यांच्या समभागांचीही मोठ्या प्रमाणात विक्री झाली. ७ ऑगस्टनंतरच्या सर्वात मोठ्या विक्रीच्या लाटेमुळे बँकिंग क्षेत्रावरही परिणाम झाला.

अमेरिकेने सर्व व्यापारी भागीदारांवर १० टक्के अतिरिक्त शुल्क लावण्याचा निर्णय घेतल्यानंतर गुंतवणूकदारांचे अब्जावधी डॉलर्सचे नुकसान झाले आहे. तसेच, अमेरिकेतील महागाई आणि बेरोजगारीचा धोका वाढल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या धोरणामुळे अमेरिकन अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार नसल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे. अमेरिकेत मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीची संधी आहे. हे श्रीमंत होण्यासाठी उत्तम वेळ आहे,असे ट्रम्प यांनी सांगितले.

मात्र, चीनने ट्रम्प यांच्या धोरणाला जोरदार प्रत्युत्तर देत अमेरिकेवरील निर्यात शुल्क ३४ टक्क्यांनी वाढवले आहे. तसेच, अमेरिकेत उत्पादन निर्यात करणाऱ्या काही कंपन्यांवर निर्बंध लावण्यात आले आहेत. चीनच्या या प्रतिसादामुळे व्यापारयुद्ध उभे राहण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. युरोपियन युनियननेही अमेरिकेच्या नव्या धोरणाला विरोध दर्शवला असून, आवश्यक त्या उपाययोजना करण्याचा इशारा दिला आहे. युरोपियन युनियन ट्रेड कमिशनर मारोस सफकोविक यांनी अमेरिकन अधिकाऱ्यांशी झालेल्या

पान २ ▶

